# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990


लातूर वर्ष ४ थे अंक २४७ वा गुरूवार दि.२७ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## विरोधी पक्षनेत्याची खुर्ची काहीकाळ रिकामी राहू द्या



मुंबई : प्रतिनिधी विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदाची खुर्ची आणखी काही काळ रिकामी राहण्याची शक्यता आहे. स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीच तसे संकेत दिले आहेत. विधानसभेत उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे अण्णा बनसोडे यांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. त्यावेळी सभागृहात डाव्या बाजूला पहिल्या रांगेतील पहिली खुर्ची उपाध्यक्षांची असते. तर, दुस-या खुर्चीवर विरोधी पक्षनेते बसतात.

उपाध्यक्षांच्या खुर्चीवर त्या रिकाम्या खुर्चीवर आज अण्णा बनसोडे विराजमान झाले. आता त्यांच्या शेजारची खुर्ची भरा, विधानसभा अध्यक्षांची निवड करा, अशी विनंतीवजा मागणी विरोधी बाकांवरून होत होती. अन्यथा उपाध्यक्ष बनसोडे यांना एकटे वाटेल, अशी मिश्किल टिप्पणीही झाली. त्यावर, काही काळ त्यांना मोकळे बसू द्या, असे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले. शिवाय, बाजुच्या खुर्चीचा निर्णय ज्यादिवशी अध्यक्ष घेतील, तो आम्हाला मान्य असेल, तोपर्यंत बाजुची खुर्ची काही काळ रिकामी राहू द्या, असे फडणवीस म्हणाले.

त्यावर, घाईत निर्णय घेऊ का? , असा प्रश्न नार्वेकर यांनीच विरोधी बाकांकडे पाहून केला. त्यावर विरोधी बाकांवरून काही उत्तर आले नाही. त्यामुळे विरोधी पक्ष नेत्याच्या निवडीची काही घाई नाही, त्याला कदाचित आणखी अवकाश असल्याची चर्चा रंगली.

## लातूरच्या गंज गोलाईतील सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सौ.निर्मलाताई कांबळे यांची निवड



लातूर :-- येथील मराठवाड्यातील प्रथम मानाची सार्वजनिक गुढी महोत्सव समितीची नांदेड रोडवर समितीचे संस्थापक अध्यक्ष दीपक गंगणे यांच्या अध्यक्षतेखाली आज बुधवार दि २६ मार्च रोजी दुपारी १ वाजता बैठक संपन्न होऊन सर्वानुमते २०२४ - २०२५ सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सव समितीच्या २७ व्या अध्यक्षपदी सौ. निर्मलाताई कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली.महिलेची सार्वजनिक गुढी पाडव्याच्या अध्यक्ष पदी सौ.निर्मलाताई कांबळे यांची निवड करण्यात आल्याने सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे. यावेळी समितीचे सचिव गिरीष तुळजापूरे यांच्या हस्ते निर्मलाताई कांबळे यांचा शॉल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या लातूर शहरात सार्वजनिक गुढीपाडवा महोत्सव समितीच्या माध्यमातून सण १९९८ पासून लातूर शहरातील मध्यवर्ती गंज गोलाई भागात आई जगदंबा मंदिराच्या समोर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक तिरंगा गुढी मान्यवरांच्या हस्ते उभारून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकरणार्या व्यक्तीचा सत्कार करीत सामाजिक जनजागृती पर संदेश देऊन जनजागृती करण्यात येते प्रतिवर्षां प्रमाणे या ही वर्षी सार्वजनिक गुढी महोत्सव समितीच्या वतीने सार्वजनिक गुढीपाडवा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे यावेळी सार्वजनिक गुढीपाडवा महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष दीपक गंगणे ,गिरीश तुळजापूरे चंद्रप्रकाश बगडे,बाबासाहेब बनसोडे,गणेश घोडके,राजकुमार जोशी ,भगवेश्वर धनगर यांची प्रमुख उपस्थिती होती

## लातूर शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी सिग्नल, पार्किंगचे योग्य नियोजन करावे - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर :- शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि प्रमुख चौकांमध्ये होणारी वाहतूक कोंडी रोखण्यासाठी आवश्यकतेनुसार सिग्नल आणि पार्किंगचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्हास्तरीय रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्यासह महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. शहरात वर्दळीच्या ठिकाणी बेशिस्तपणे वाहनांचे पार्किंग केले जात असल्याने वाहतुकीची कोंडी होत असल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक वाहनांसाठी पार्किंगची ठिकाणे निश्चित करावीत. यासाठी महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग, शहर वाहतूक शाखा यांनी संयुक्तपणे पाहणी करून पार्किंगची ठिकाणे निश्चित करावीत. तसेच प्रमुख चौकांच्या ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडी होवून वाहतूक विस्कळीत होत आहे. अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार सिग्नल कार्यान्वित करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवावी

वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याने होणाऱ्या रस्ते अपघातांचे प्रमाण अधिक आहे. हे अपघात रोखण्यासाठी वाहनधारकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती आवश्यक आहे. याकरिता परिवहन विभाग, वाहतूक पोलीस शाखा, सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्तपणे जनजागृती मोहीम राबवावी. यामध्ये वाहनांवर रिफ्लेक्टर लावण्याबाबत सूचना द्याव्यात, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

## नांदेड जिल्ह्यातील प्रसिद्ध युवा उद्योजक नागनाथ आनंतवाड यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर



नांदेड / हनुमंत चंदनकर:- नांदेड जिल्ह्यातील प्रसिद्ध युवा उद्योजक तथा अडत असोशियचे जिल्हा सचिव नागनाथ आनंतवाड यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला सदर पक्षप्रवेश माजी मंत्री भास्कर पाटील खतगावकर यांच्यावर विश्वास ठेवून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला नागनाथ आनंतवाड हे प्रत्येकाच्या सुखदु:खात सहभागी होतात यांच्यासोबत तरूणाची मोठी फळी आहे समाजाचं काही देणं लागतो म्हणून ते विविध धार्मिक सामाजिक उपक्रम राबवतात आज त्यांच्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात होत आहे माजी मंत्री भास्कर पाटील खतगावकर यांचे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे गेल्या दोन दशकांपासून युवा उद्योजक म्हणून तर ५ वर्षापासून अडत असोसिएशन नांदेड जिल्हा सचिव म्हणून काम पाहतात येणाऱ्या काळात ते राजकीय क्षेत्रातून जनसेवा करण्याच्या दृष्टीने समोर ठेवून राजकारणात सक्रिय झाले आहेत त्यांच्या प्रवेशाने पक्षांना मोठ बळ मिळेल



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव च्यावतीने दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर शिवाजी गायकवाड यांची भेट घेऊन विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संकल्पित होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली या भेटीदरम्यान सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष सुशीलकुमार महादेव चिकटे यांचा सत्कार दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला . यादरम्यान समितीचे कोषाध्यक्ष बाबा कांबळे,सचिव राहुल कांबळे, कार्याध्यक्ष ड.रमक राजाभाऊ जोगदंड, उपाध्यक्ष अमोल भैया शिंदे व एडवोकेट अभय कांबळे संघटक विनय जागते, चिंटू गायकवाड सांस्कृतिक प्रमुख आकाश सरवदे,रितेश गायकवाड सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने डॉ.उदय मोहिते अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर यांची भेट घेऊन विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संकल्पित होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली या भेटीदरम्यान सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार महादेव चिकटे, कोषाध्यक्ष बाबा कांबळे,सचिव राहुल कांबळे कार्याध्यक्ष ड.रमक राजाभाऊ जोगदंड,उपाध्यक्ष ड अभय कांबळे, व अमोल भैया शिंदे, संघटक विनय जाकते, चिंटू गायकवाड, सांस्कृतिक प्रमुख आकाश सरवदे, रितेश गायकवाड. सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी केली कोल्हापुरी बंधाऱ्यातील पाण्याची पाहणी. दोन दिवसात पाणी अडविण्याचे कंत्राटदाराचे आश्वासन



किनवट: शेख शौकत :-माहूर शहरासह श्री रेणुका माता मंदिरावर पाणीपुरवठा करणाऱ्या पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापुरी बंधाऱ्यात साठविलेले पाणी वाहून जात असल्याने नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड कार्यालय अधिक्षक वैजनाथ स्वामी यांचे सह नगरसेवकांनी पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापुरी बंधाऱ्यावर जाऊन कोल्हापुरी बंधाऱ्याजवळ पाण्याची पाहणी केली.नदीपात्रात सुरू असलेल्या मोठ्या बंधाऱ्याच्या कंत्राटदारांच्या प्रतिनिधींना बोलावून कोल्हापुरी बंधाऱ्यात मातीचा बांध टाकून पाणी अडविण्याचे सांगितल्याने कंत्राटदार यांनी दोन दिवसात संपूर्ण बंधाऱ्यात पाणी अडवून देण्याचे आश्वासन दिले असून माहूरच्या पाणीपुरवठा प्रति नगरपंचायत सजग असल्याने त्यांचे माहुरकरासह भाविकातून अभिनंदन होत आहे माहूर शहरासह श्री रेणुका माता मंदिरावर पाणीपुरवठा करणाऱ्या पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापूर बंधाऱ्यात पंधरा दिवस पुरेल इतकेच पाणी राहिल्याने माहूरकरांची चिंता वाढली होती त्याची तात्काळ दखल घेत नगरपंचायत चे पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी थेट बंधारा गाठून कंत्राटदारांच्या प्रतिनिधींना पाणी आडविण्याचे सूचना दिल्या यावेळी बंधार्यावर पाणीपुरवठा सभापतींचे प्रतिनिधी रणधीर पाटील, बांधकाम सभापती प्रतिनिधी रफीक सौदागर, नगरसेविका प्रतिनिधी ईरफान भाई,अफसर भाई,देविदास सिडाम,अभियंता विशाल ढोरे, स्वच्छता विभागाचे गणेश जाधव व ईतर उपस्थित होते. माहूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी एकमेव पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापुरी बंधारा असून येथे आमदार भीमराव केराम यांच्या माध्यमातून नवीन मोठ्या बंधाऱ्याचे काम शारदा कंट्रक्शन कडून जलद गतीने करण्यात येत असले तरीही बंधाऱ्यातील पाणी त्यांना डायव्हर्ट करून दुसरीकडून काढावे लागले आता मात्र नदी पात्रातील पाण्याची धार कमी झाल्याने कोल्हापुरी बंधाऱ्यात अर्ध्यावरच माती टाकून पाणी थांबविल्याने पाणीसाठा वेगाने कमी होत असल्याने माहूरकरांची चिंता वाढली होती त्यामुळे नगरपंचायत माहूर कडून याप्रकरणी तात्काळ दखल घेत पाहणी केल्याने आता संपूर्ण कोल्हापुरी बंधाऱ्यात पाणी थांबणार असल्याने पाण्याची चिंता मिटणार आहे त्यामुळे माहूरकरासह भाविकातून नगरपंचायत चे पदाधिकारी अधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे

## 'गद्दार'वरून उत्तरप्रदेशात रणकंदन; दगडफेकीत पोलीसांची डोके फुटली



आग्रा : वृत्तसंस्था उत्तर प्रदेशात 'गद्दार'वरून वाद पेटला आहे. राज्यसभेमध्ये राणा संगा यांना गद्दार म्हणणारे सपा खासदार रामजी लाल सुमन यांच्या आग्रा येथील घरावर करणी सेनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला. बुलडोझरसह १००० हून अधिक कार्यकर्ते खासदारांच्या निवासस्थानी पोहोचले. मोठ्या प्रमाणात तोडफोड आणि दगडफेक केली. या चकमकीत अनेक पोलीसांची डोकी फुटली आहेत. करणी सेनेच्या कार्यकर्त्यांनी खासदारांच्या घराबाहेर ठेवलेल्या ४० ते ५० खुर्च्या फोडल्या. मुख्य गेट तोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. कार्यकर्त्यांनी खासदारांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या १० हून अधिक वाहनांची तोडफोड केली. घटनास्थळापासून १ किमी अंतरावर सीएम योगींचा कार्यक्रम सुरू होता.

करणी सेनेच्या कार्यकर्त्यांचा गोंधळ थांबवण्यासाठी सपाचे कार्यकर्तेही खासदारांच्या घरी पोहोचले. करणी सेनेच्या कार्यकर्त्यांशी हाणामारी झाली. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून पोलिसांनी लाठीचार्ज सुरू केला. मात्र, तरीही परिस्थिती नियंत्रणात येऊ शकली नाही. सुरक्षेच्या दृष्टीने सपा खासदारांच्या सोसायटीचे दोन्ही दरवाजे बंद करण्यात आले. कोणीही घराबाहेर पडणार नाही, अशा स्पष्ट सूचना पोलिसांनी दिल्या आहेत.

राज्यसभेत सपा खासदार काय म्हणाले? सपा खासदार रामजीलाल सुमन यांनी म्हटले की, मुस्लिमांकडे बाबरचा डीएनए आहे, मग हिंदूंमध्ये कोणाचा डीएनए आहे? बाबरला कोणी आणले? बाबरला राणा संगाने भारतात इब्राहिम लोदीचा पराभव करण्यासाठी आणले होते. जर मुस्लीम बाबरची मुले असाल तर तुम्ही (हिंदू) गद्दार राणा सांगाची मुले आहात. याचा निर्णय भारतात व्हायला हवा. राणा सांगा नव्हे तर बाबर यांच्यावर टीका केली जाते. भारतीय मुस्लिम बाबरला आपला आदर्श मानत नाहीत. मोहम्मद साहेब आणि सुफी परंपरेला ते आपले आदर्श मानतात.

## संपादकीय....

### लालूप्रसाद यादव यांची पुन्हा घेराबंदी

सहा महिन्यांवर येऊन ठेपलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आणखी एक पाऊल पुढे टाकत लालूप्रसाद यादव आणि कंपनीच्या मागे पुन्हा 'ईडी'चा ससेमिरा लावला आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते, लालूपुत्र तेजस्वी यादव यांच्या शिडातील हवा काढून घेण्याचा हा प्रयत्न कसा सफल होणार?

बिहारच्या नितीशकुमार मंत्रिमंडळातील रिक्त कोटा भरत आपल्या सात आमदारांवर नवी जबाबदारी दिल्यानंतर भारतीय जनता पक्षाने सत्तेच्या वाटेतील काटे दूर करण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. 'दलित–यादव' मतांचे हुकमी राजकारण करणारे राष्ट्रीय जनता दलाचे ज्येष्ठ नेते लालूप्रसाद यादव, त्यांचे पुत्र तेजस्वी यादव या यादव परिवाराचा बंदोबस्त कसा करायचा, ही मोठी डोकेदुखी झाल्याने भाजपने 'ईडी'अस्त्र नव्याने बाहेर काढले. एखाद्या महत्त्वाच्या प्रकरणाचे भिजत घोंगडे कसे ठेवायचे आणि त्यावर राजकारण कसे तापवायचे, याचे हे ठळक उदाहरण ठरावे. चारा घोटाळा, बेनामी संपत्ती, खंडणी, अपहरण, माती घोटाळा अशा अनेक आर्थिक गैरव्यवहारांमुळे गाजलेल्या राष्ट्रीय जनता दल सरकारच्या कालखंडात बिहारची 'जंगलराज' अशी ओळख निर्माण झाली. या 'बिमारू' राज्याला त्यातून बाहेर कसे काढायचे? त्यासाठी सक्षम राजकीय पर्याय देण्याच्या हेतूने भारतीय जनता पक्षाने एकिकृत जनता दलातून बाहेर पडलेल्या संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार यांचा चेहरा पुढे करत लालूपर्वाला ब्रेक लावला. सत्तेपासून दूर ठेवले. रेल्वेमंत्री (२००४–२००९) असताना लालूप्रसाद यांनी देशाची रेल्वे रुळावर आणली खरी; पण ती आणताना आपल्या सग्यासोयर्यांचेही भले केले. त्यांच्या कारकिर्दीवर डाग लागला तो रेल्वे भरती घोटाळ्याचा. जमिनीच्या बदल्यात बिहारमधील हितसंबंधीयांना रेल्वेत नोकरी देऊन पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर आहे. या प्रकरणात सीबीआय आणि ईडी चौकशीचा ससेमिरा मागे लागला असला, तरी लालूप्रसाद यादव आणि त्यांचे राजकारण संपले नाही वा ते संपवण्यात भाजपला यश आले नाही. वीस वर्षांपूर्वीच्या या घोटाळ्याचा सोक्षमोक्ष आजही लावता आलेला नाही.

लालूप्रसाद यादव, त्यांची पत्नी माजी मुख्यमंत्री राबडीदेवी, मुली मिसा भारती, हेमा यादव यांच्यासह अख्खा लालू परिवारच या घोटाळ्यात आकंठ बुडाल्याचे आरोपपत्रावरून दिसते. २०२२ मध्ये म्हणजे तेरा वर्षांनंतर रेल्वे भरती घोटाळ्याच्या आरोपावरून त्यांच्या विरोधात भ्रष्टाचाराची तक्रार दाखल झाली आणि सीबीआयने गेल्याच वर्षी जूनमध्ये ७८ जणांवर आरोपपत्रही दाखल केले. यातील काही प्रकरणांत ईडी चौकशी सुरू असून ईडीने या सर्वांना पुन्हा एकदा समन्स बजावले आहे. लालू आणि त्यांचा परिवार जामिनावर बाहेर आहे. 'टायगर अभी जिंदा हैं' असे सांगत लालू समर्थकांनी आपल्या व्होट बँकेला हाक दिली आहे. पंचाहत्तरी पार केलेले लालूप्रसाद यादव यांचा आत्मविश्वास बळावला आहे. यावेळी 'तेजस्वी यादव यांना सत्तेपासून कोणीच (माई का लाल) रोखू शकत नाही' या शब्दात त्यांनी विरोधकांना आव्हान दिले आहे. भाजपसमोर दोन मोठी आव्हाने आहेत. दलबदलू नेते अशी प्रतिमा असलेले मुख्यमंत्री नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून पुढे केले असले, तरी ते निवडणुकीनंतर कोणता पवित्रा घेणार, हे कोणीच खात्रीने सांगू शकत नाही. भाजपला स्वबळावर आणि गरज लागली, तर नितीशकुमार यांच्या पाठिंब्यावर आपला मुख्यमंत्री करायचा आहे. पक्ष महाराष्ट्रातील 'शिंदे पॅटर्न' राबवण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे नितीशकुमार यांच्याशी सबुरीने घेण्याशिवाय पर्याय नाही. विरोधी आघाडीवर तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दलाला तोंड द्यावे लागणार आहे. इतके घोटाळे होऊनही या पक्षाला आणि लालू परिवाराला जनतेने नाकारलेले नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. तेजस्वी यादव यांच्या कुबड्या घेऊन राजकारण करणार्या काँग्रेसच्या हाती यावेळीही मोठे काही हाती लागण्याची शक्यता कमीच. मावळत्या विधानसभेत १९ आमदार आणि लोकसभेत केवळ तीन खासदार पाठवणार्या या पक्षाची सारी भिस्त तेजस्वी यादव यांच्यावरच आहे. बदलत्या राजकीय वार्यावर स्वार होण्याशिवाय काँग्रेससमोर पर्याय दिसत नाही. पक्षाचे नेते राहुल गांधी त्या दिशेने पाऊल टाकताना दिसतात.

अर्थात, व्होट बँक शाबूत राखण्याची विरोधकांची ही रणनीती भाजपला त्रासदायक ठरणार, हे स्पष्टच आहे. भाजपकडे माजी मुख्यमंत्री जितनराम मांझी, केंद्रीय मंत्री चिराग पास्वान हे नेते असले, तरी मर्यादेपलीकडे त्यांचा फारसा उपयोग पक्षाला झालेला दिसत नाही. भाजपला कोणत्याही स्थितीत स्वबळाचे सरकार आणायचे आहे. सध्याच्या ७८ आमदारांवरून बहुमतासाठीचे १२२ संख्याबळ आणणे तितके सोपे नाही. ते साधण्यासाठी २००५ नंतरचे गेल्या वीस वर्षांतील विकासाचे राजकारण नव्या पिढीसमोर आणण्याचे धोरण पक्षाने आखले आहे. अर्ध्याहून अधिक म्हणजे सुमारे सात कोटी युवा मतदारांना 'जंगलराज'ची माहिती देत त्यांच्यासमोर विकासाचे नवे मॉडेल ठेवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. राज्यात गुंतवणुकीचे मोठे प्रकल्प देत निधीचा ओघ वाढवल्याने बिहारचा चेहरामोहरा बदलत आहे, हे वास्तव असले, तरी मतदारांची मानसिकता बदलायची कशी, हा मोठा प्रश्न आहे. भाजप–नितीश सलग सत्तेमुळे नकारात्मक परिणाम होण्याची शक्यताही आहे. भाजपने पर्यायी राजकारण उभे केले असले, तरी स्वतंत्र नेतृत्व आणि प्रबळ पक्ष संघटन उभे करण्यात अपेक्षित यश आलेले नाही.

# आमदार–खासदारांनी गलेलठ्ठ पगार,भत्ते व पेंशन घ्यावेत,मग शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांनी काय करावे!

आजी–माजी खासदारांचे वेतन, निवृत्तिवेतन आणि अतिरिक्त भत्यांमध्ये घसघशीत २४ टक्के वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याने शेतकरी, गरीब व सर्वसामान्यांमध्ये व्दिधा निर्माण होवून राजकीय पुढाऱ्यांच्या प्रती घृणा निर्माण झाल्याचे दिसून येते.देशात दिवसेंदिवस जनप्रतिनिधी व लोकप्रतिनिधी सोबतच राजकीय पुढारी सुध्दा मालामाल होतांना दिसतात.यावर मात्र पक्ष–विपक्ष नेहमीच चुप्पी साधुन बसतात.कारण यात दोघांचेही स्वार्थ लपलेले असते.देश चालविणारे हेच; कायदे बनविणारे सुध्दा हेच त्यामुळे मनात येईल तेवढे पगार, भत्ते व पेंशन वाढवून घेतात.ही बाब लोकशाहीच्या बाबतीत अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. देश सुजलाम सुफलाम व्हावा व सर्वांना समान अधिकार व न्याय मिळावा यासाठी आपल्या पुर्वजांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देशाला इंग्रजांच्या तावडीतून सोडवून स्वतंत्र मिळवून दिले.याकरीता देशाचे क्रांतिकारक,थोर पुरुष, राजे महाराजे, कळत–नकळत लाखो देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तेव्हाच १९४७ उदयास आले व देश स्वतंत्र झाला आणि सर्वांनाच मोकळा स्वास घेण्याचे भाग्य लाभले.परंतु देशात गेल्या वीस वर्षांपासून राजकीय पुढारी स्वार्थी झाल्याचे दिसून येते.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडो रुपयांची चल–अचल संपत्ती दिसून येते.सोबतच उच्च पदस्थ ८० टक्के अधिकारी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झालेले दिसतात.याचे जीवंत उदाहरण म्हणजे न्यायाधीश यशवंत वर्मा.म्हणजे जनुकाय देशाच्या लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी यांनी देशाची लुट लावली की काय असे वाटत आहे.आज देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारीची समस्या, महागाईने मोठ्या प्रमाणात उच्चांक गाठला आहे, सोन्याच्या भावाने तर संपूर्ण सिमा ओलांडली आहे, बदलत्या हवामानामुळे निसर्ग शेतकऱ्यांना साथ देत नसल्याने त्यांचे हालबेहाल होत आहेत, खाजगी क्षेत्रात पगार वाढ नाही अशा परिस्थितीत सर्वसामान्यांचे जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे, आता गरीब वर्ग हातावर आणुन पानावर खातात या संपूर्ण गोष्टी वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी सर्वच धडपडत करीत असतात.परंतु सध्याच्या काळात श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे तर गरीब हा गरीबीच्या खाईत दबत आहे.आज सरकार मार्फत खासदारांना २४ टक्के पगार वाढ व पेंशन वाढ घोषित करण्यात आली,यामुळे सर्वसामान्यांपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.पुर्वी १ लाख रुपये पेंशन होते आता १लाख २४ हजार रुपये झाले,पुर्वी मतदार संघाचा भत्ता ७० हजार रुपये होता आता ८७ हजार रुपये झाला, कार्यालय खर्च ६० हजार रुपये होता आता ७५ हजार रुपये झाला, पुर्वी पेंशन २५ हजार रुपये होती आता ३१ हजार रुपये झाली.हा पैसा सरकार जवळ येतो कोठुन याचा विचार खासदारांनी किंवा सरकारने कधीच केला नाही.कारण हा संपूर्ण पैसा देशाच्या १४० कोटी जनतेच्या खिशातला आहे आणि जनतेचे खिशे कापून जर खासदार वेतन वाढ करीत असेल तर देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. कारण आज देशातील आमदार –खासदार–मंत्री यांना जे काही पगार, पेंशन, भत्ते व इतर सुखसुविधा मिळत आहे ती फक्त देशाच्या जनतेच्या पैशाच्या बळावरच.आमदार–खासदारांना खुप काही मेहनत करावी लागत नाही किंवा कोणतेही ओझे उचलावे लागत नाही तरी त्यांना गलेलठ्ठ पगार, भत्ते व पेंशन हे देशात चाल्लय तरी काय!आज ईपीएस–९५ चा पेंशनधारक गेल्या १० वर्षांपासून मिनिमम पेंशन ७५००, महागाई भत्ता व आरोग्य सुविधांची मागणी करीत आहे याकरीता खासदार, मंत्री यांना निवेदन, चर्चा करून सुद्धा त्याकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करून पाठ फिरवत आहे.आज ईपीएस–९५ पेंशन धारकांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेंशन मिळत आहे.यात घर टॅक्स, पाण्याचे, औषधोपचार, खाण्यापिण्याचा खर्च कसा काय पुर्ण करणार अशी गंभीर परिस्थिती आज पेंशन धारकांची आहे. त्यांचाही विचार सरकार करीत नाही जनुकाय त्यांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटते.त्यामुळे तो जगुही शकत नाही आणि मरूही शकत अशी भयावह व गंभीर परिस्थिती देशाच्या दिड करोड ईपीएस –९५ पेंशन धारकांची आहे. याला कोणती लोकशाही म्हणावी किंवा सर्वसामान्यांना न्याय देणारी सरकार म्हणाव असाही प्रश्न उपस्थित होतो.आमदार असो अथवा खासदार यांना पगार, पेंशन व भत्यांची काय आवश्यकता हे तर लोकांचे कल्याण व जनसेवा करण्यासाठी आहे ना!मग यांना एवढा गलेलठ्ठ पगार भत्ते पेंशन कशाला हवे.आज शेतकऱ्यांजवळ करोडोची शेतजमीन आहे परंतु पैशाने मात्र शुन्य आहे.कारण शेतकऱ्यांच्या मालाला सरकारकडुन योग्य भाव मिळत नाही, बदलत्या हवामानामुळे निसर्ग सुध्दा साथ देत नाही.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांवर आत्महत्येची पाळी येते. परंतु देशाचा आमदार–खासदार मात्र पाच वर्षात मालामाल झालेला दिसुन येतो हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. देशाची १४० करोड जनता आमदार –खासदार यांना देशाची सेवा करण्यासाठी निवडून देतात जेणेकरून देशसेवा व जनसेवा करून देश सुजलाम सुफलाम व्हावा. परंतु खासदारांच्या २४ टक्के पगारवाढीवरून असे लक्षात येते की आजचा राजकीय पुढारी फक्त स्वतःचीच व स्वतःच्या परिवाराची सेवा करण्यासाठी लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी झाल्याचे दिसून येते.देशाच्या १८ व्या लोकसभेत निवडून आलेले ५४३ खासदारांपैकी २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत.यात ३९ टक्के मंत्री गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत,तर २८ खासदारांना वेगवेगळ्या कोर्टाने गुन्हेगार घोषित केले आहे.यातील १९ खासदारांवर हत्या आणि महिला अत्याचारांसारखे अत्यंत गंभीर आरोप आहेत, तरी यांना सरकार कडून पगार, भत्ते व पेंशन वाढ सोबतच संपूर्ण सुविधा प्राप्त आहे ही बाब शेतकऱ्यांच्या प्रती व सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत धक्कादायक बाब आहे. त्याचप्रमाणे एक स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉम्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की,देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत.तरी यांना पगार, पेंशन व इतर भत्ते सुरळीत मिळतात.मग प्रश्न निर्माण होतो की गुन्हेगारांना एवढ्या सुखसुविधा व शेतकरी, गरीब आणि सर्वसामान्यांचे हालबेहाल ही बाब आमदार–खासदाराच्या प्रती अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.तरीही मोठ्या डौलाने सांगतात की आम्ही समाजसेवक,लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी आहोत. आता असे चित्र दिसत की खासदार तुपाशी आणि सर्वसामान्य उपाशी.आमदार–खासदार यांना खरोखरच देशसेवा करायची असेल तर निस्वार्थीपणे देशसेवा केली पाहिजे. पैशांचा मोह तेवढाच ठेवावा जेवढी आवश्यकता आहे. वाजवीपेक्षा जास्त पैसा असेल तर सरकारी तिजोरीत जमा करावा जेणेकरून तो पैसा जनकल्याणासाठी व देशाच्या उपयोगात आला पाहिजे आणि देश समृद्ध झाला पाहिजे.जय हिंद!

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

शेती व्यवसाय करत असताना होणारे अपघात, रस्ते, वाहन अपघात आदी कारणामुळे मृत्यू किंवा दिव्यांगत्व आल्यास अपघातग्रस्त शेतकऱ्यास किंवा त्याच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्यासाठी 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना' राबविण्यात येत आहे. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस किंवा त्यांच्या कुटुंबास आर्थिक सहाय्य करुन संकटातून बाहेर काढत त्यांना मानसिक बळ देण्यासाठी 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना' महत्वपूर्ण ठरली आहे.

योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदास पात्र बाबी

रस्ता किंवा रेल्वे अपघात, पाण्यामध्ये बुडून मृत्यू, जंतुनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीजपडून झालेला मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात, सर्पदंश, विंचूदंश, नक्षलाईटकडून झालेली हत्या, जनावरांच्या हल्ल्यामुळे किंवा चावण्यामुळे जखमी अथवा मृत्यू, बाळंतपणातील मृत्यू, दंगल, अन्य कोणतेही अपघात या अपघातांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही एक सदस्य (आई–वडील, शेतकऱ्याची पत्नी/पती, मुलगा व अविवाहीत मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वर्ष वयोगटातील एकूण २ सदस्याचा समावेश करण्यात आला आहे. ही योजना संपूर्ण दिवसासाठी म्हणजेच योजनेच्या विहित कालावधीतील प्रत्येक दिवसांच्या २४ तासांसाठी लागू आहे. तथापि या योजनेंतर्गत लाभास पात्र असणाऱ्या शेतकऱ्याने किंवा शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतल्यास या योजेनेअंतर्गत लाभ मिळण्यास अपात्र असेल.

योजनेअंतर्गत देण्यात येणारे सानुग्रह अनुदान

अपघाती मृत्यू, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी होणे, अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास अशावेळी २ लाख रुपये आणि अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास १ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे.

लातूर जिल्ह्यात गत दोनवर्षात सुमारे १८९ कुटुंबांना मदत

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतून लातूर जिल्ह्यात १९ एप्रिल २०२३ ते आज अखेरपर्यंत १८९ शेतकरी कुटुंबांना सहाय्य करण्यात आले आहे. सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात ७५ कुटुंबांना १ कोटी ४८ लक्ष रुपये आणि सन २०२४–२५ मध्ये आज अखेरपर्यंत ११४ कुटुंबांना २ कोटी २६ लक्ष रुपये सहाय्य देण्यात आले आहे.

आवश्यक कागदपत्रे

विहीत नमुन्यातील अर्ज, सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्याचे वारस म्हणून तलाठ्याकडील गांव नमुना क्र. ६ नुसार वारसाची नोंद, शेतकऱ्याच्या वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र अथवा ओळख किंवा वयाची खात्री होईल, असे कोणतेही कागदपत्रे, प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, पोलीस पाटील यांचा माहिती अहवाल तसेच अपघाताच्या स्वरुपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. संबंधित अपघातग्रस्त शेतकरी/ शेतकऱ्यांचे वारसदारांनी सर्व आवश्यक कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे अपघाताचे प्रकरण निदर्शनास आल्यापासून तीस दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. प्रस्तावासाठी कृषि विभागाचे संबंधित गावातील कृषि सहाय्यक, पर्यवेक्षक आदी क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी मार्गदर्शन करतील.

********

संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

# मांजराच्या मागे पिंजरा...

आपला देश मोठा लोकशाही प्रधान देश म्हणून जगात सर्वदूर परिचित आहे. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही म्हणून जग आपल्याकडे बघतं. विधानसभा , विधानपरिषद, लोकसभा, आणि राज्यसभा ह्यात निवडून जाणारे सभासद हे सभागृहात जनतेचे प्रतिनिधी म्हणून जातात. जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी आपला वेळ खर्ची घालावा असं अपेक्षित आहे. परंतु आता त्या सभागृहाचं, पदांचं पावित्र्य राखणारे सदस्य सभागृहात निवडून जात नाहीत, तर त्यात बहुतेक अनेक प्राणी आणि गुंड प्रवृत्तीचे लोक निवडून जातात त्यामुळे देशात लोकशाहीची थट्टा चाललीय. कारण सभागृहात जाणारे लोक सेवाभावी नाहीत. अनेक बहुरूपी ,कलाकार आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी सभागृहात प्रवेश केल्यामुळे उद्देश बाजूला राहून नको त्या वादाला तोंड फुटल्याची अनेक उदाहरणे आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेत चक्क मांजराचा म्याव म्याव आवाज झाला होता हे अनेकांच्या स्मरणात असेल. सभागृहात गोंधळ उडाला .कोरोनामुळे प्रत्येकाच्या नाकातोंडावर मास्क असल्याने कोणत्या मांजराला काय सुचवायचे होते ते लगेच लक्षात आलं नाही . नंतर मांजराचा शोध लागला. टीव्हीवर हे मांजरन्यूज बघत असतांना माझ्यासारख्या प्रेक्षकाला प्रश्न पडला की हे मांजर का म्याव म्याव करतं? मग लक्षात आलं , मांजराला वाटतं की वाघ दुबळा झालाय. वाघाचं मांजर झालंय मग वाघानेही डरकाळी फोडली. आणि सांगितलं की आम्ही वाघच आहोत. लहान असतांना मांजर वाघाची मावशी आहे वगैरे ऐकायचो . तेव्हा मांजर आणि वाघात चांगले संबंध, अगदी घरेलू सबंध असावेत वगैरे वाटायचं . त्यांच्यात काहीही वैर वगैरे नसावं, कधी एकमेकावर हे खेकसत नसावेत , एकमेकावर तुटून पडत नसावेत, आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडणं वगैरे कधीच नसेल असं वाटायचं. पुढे वय वाढत गेलं तसा वाघ आणि मांजरातील फरक लक्षात आला . त्यांच्यात कोणतंही नातं नाही. दोघेही शिकारी आहेत , हे समजलं. इथपर्यंत वाघ मांजराचं मला माहित आहे . वाघ जंगलात राहतो. तो लहान मोठ्या प्राण्यांची शिकार करतो . आणि मांजर रानात आणि गावात राहते ती लहान मोठ्या प्राण्यांची उंदीर वगैरे खास करून खाते इतकं सर्वज्ञात सामान्य ज्ञान अवगत झालं . पण जिथे लोक आपले प्रश्न मांडण्यासाठी आणि त्या प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी प्रतिनिधी पाठवतात त्या सभागृहात प्रत्यक्ष काय घडतंय , तर मांजर म्याव म्याव करतं . आणि वाघ डरकाळी फोडतो . तिथे सभागृहाचं पावित्र्य संपतं. तिथे म्याव म्याव करणारे बहुरूपी पाठविले जातात . मग ते काही करू शकत नाही. तेव्हा म्याव म्याव करतात . लोकशाहीतील लोकप्रतिनिधींच्या सभागृहाचं पावित्र्य त्यानंतरही आणि त्यापूर्वीही धोक्यात आलं . सभागृहात गंभीर विषयावर चर्चा होतांना दिसत नाही. सभागृहात कामाची वेळ उद्भवलेल्या प्रश्नांसाठी लावली जात नाही.

बलात्काराच्या घटनांनी महाराष्ट्रच नाही तर देश हादरला. परभणी जिल्ह्यातील शहीद सोमनाथ सूर्यवंशी आणि बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख सरपंच हे हत्याकांड अतिशय क्रूर आहे. त्या क्रूरतेचे अनेक पुरावे सोशल मीडियावर प्रसारित झाले. लोक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत . आणि देशमुख यांच्या हत्याकांडातील आरोपी अनेक दिवस मोकाट फिरत राहिले . या हत्याकांडात काही बड्या नेत्यांचे , मंत्र्यांचे वरदहस्त असल्याने वाल्मीक कराड सारखे कथित आरोपी कायद्यात दम नाही अशा प्रकारे चकवत राहिलेत. काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याने अखेर कराड पर्यंत कायद्याचे हात पोचू शकलेत . पण त्यातील एक आरोपी अजूनही फरार आहे . फरार आरोपीला पकडण्यापूर्वीच संतोष देशमुख खून खटला न्यायप्रविष्ट झाला आहे, हे यश म्हणावं की अपयश? सोमनाथ सूर्यवंशी या आंबेडकरवादी तरुणाचा पोलीस कोठडीत पोलिसांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला असा अहवाल पुढे आला . मानवाधिकार आयोगाने आताशा याची दखल घेतली. हत्याकांडावर सभागृहात अनेकदा आरोप प्रत्यारोप झालेत . कोण कोणाचा आका हे ठरविण्यातच आणि असले आरोप फेटाळण्यातच सभागृहाचे कामकाज संपत गेले . महाराष्ट्रभर मंत्रीपदाच्या राजीनामेची मागणी झाली पण अजूनही मंत्री म्हणून उजळ माथ्याने आरोपांचे ओझे घेऊन फिरणारे मंत्री महाराष्ट्राने पाहिले.

सभागृहात होणारी चर्चा म्हणजे सार्वजनिक नळावर होणाऱ्या महिलांच्या भांडणासारखी असते . ती चर्चा थेट संपत्तीच्या वाटणीसाठी होणाऱ्या भांडणासारखी शेत शिवारावर व्हावी तसे रूप घेते . ही चर्चा ( एक प्रकारे भांडणच ते! ) इतकी विकोपाला जाते की स्वतःचे रूप आरशात पाहण्यापेक्षा एकमेकांना ते पाण्यात पाहतात . सध्याचं राजकारण बघितलं की सभागृहात येणारे सदस्य जनतेच्या समस्या सोडवायला येतात की एकमेकांना शिव्याशाप घालायला येतात तेच कळत नाही . एक काळ असा होता की एकमेकांचा सन्मान राखला जायचा. विलासराव देशमुख, आर आर पाटील... इत्यादी अशी सुसंस्कृत माणसं हरवल्याची खरी खंत वाटते. आता संस्कृत सुसंस्कृत या शब्दांशी कोणालाही सोयरसुतक नाही . या शब्दांशी कोणीही नाते सांगणार नाही . सभागृहात आपली मतं संयमानं मांडण्याऐवजी जन्माचे हाडवैर असल्यासारखे सदस्य एकमेकांवर तुटून पडतात . भाषेचा दर्जा इतका खालावतो की तुम्हाला ऐवजी तुला तुम्ही ऐवजी तू असा उल्लेख करून सौजन्याची ऐशी तैशी केली जाते. सभागृहात आता कपडे काढायचे तेवढे बाकी राहिले आहेत . त्यामुळे सभागृहाचे पावित्र्य गेलं आणि लोकप्रतिनिधींचं चारित्र्य संपलं की काय असा प्रश्न पडतो. हीच माणसं लोक संस्कृतीच्या बढाया मारतात . चारित्र्याच्या गोष्टी करतात . विधानसभा वगैरे वैयक्तिक विषयावर चर्चासत्र घडवून आणण्यासाठी नाही . त्यात जनतेच्या प्रश्नांना प्राथमिकता मिळायला हवी . नोकरी , व्यवसाय , शेती , पाणी, विज , कापूस , कांदा , ऊस असे अनेक प्रश्न आहेत . शेतकरी आत्महत्येच्या विळख्यातून सुटला नाही . आणि बेकारी प्रचंड वाढली आहे. आम्ही पक्षी आहोत, एका झाडावरचे. पदव्यांचे रत्नहार चोचीत घेऊन महाविद्यालय नावाच्या सोनेरी घरट्यातून आम्ही पक्षी नुकतेच बाहेर पडलो आहोत. आम्हाला नोकरी हवी आहे. शिपायाची , कारकुनाची ,आणि अगदी नाहीच मिळाली तर झाडू वाल्याची सुद्धा पण आम्हाला नोकरी हवी आहे ... हे संवाद ख्यातनाम नाटककार दत्ता भगत यांच्या ' जहाज फुटलं आहे ' या नाटकातील. हे संवाद साधारण ३५/३६ वर्षानंतरही जसेच्या तसे लागू पडतात .आजही प्रमाणपत्र आणि पदव्या घेऊन तरुणाई बेकारीच्या विळख्यात आहे . व्यावसायिक प्रशिक्षण घेऊनही तरुणांना कर्ज आणि काम नाही . आतापासून पाण्याचा प्रश्न पेटला आहे .जीव धोक्यात घालून विहिरीतील पाणी काढावे लागते. चार–पाच किलोमीटर वरून डोक्यावर पाण्याचे हंडे वाहावे लागतात. शेतमालाला भाव नाही . एकूणच अशा मूलभूत प्रश्नांवर चर्चा होणे अभिप्रेत असताना रोज नव्या नव्या चर्चांना उधान येते . अनिल परब आणि चित्रा वाघ यांच्यातील शाब्दिक चकमक फारच ताजी आहे . भाजपच्या सर्व नेत्यांना बहुतेक ५६ हा आकडा अगदी जादुई वाटत असावा . कारण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे ५६ इंची छाती घेऊन फिरतात . आणि आता चित्रा वाघ ह्या अनिल परब सारखे ५६ पायाला बांधून फिरतात. ही भाषा एक स्त्री म्हणून आणि विधानसभेतील एक सदस्य म्हणून किती खालच्या दर्जाची आहे याची पावती सोशल मीडियावरील चर्चेने दिली आहे. सभागृहात असे आणखीन चोर बलात्कारी गुंड प्रवृत्ती आणि खंडणी चे गंभीर आरोप असणारे अनेक विधानसभा सदस्य , मंत्री आहेत. त्यात संजय राठोड, धनंजय मुंडे..... यांच्या चारित्र्याविषयी अशीच चर्चा पिकली आहे . ते ती किती खरी आणि खोटी आहे ते त्यांचं त्यांनाच ठाऊक . पण यामुळे देशाची लोकशाही जगासमोर अनेकदा दिवसाढवळ्या विवस्त्र झालीय. लोकशाहीच्या चिंधड्या उडाल्या . आम्ही लोकशाहीच्या देशात राहतो तिथे न्याय मिळतो या गोष्टीवरचा विश्वास उडण्यापूर्वी कायद्याचे हात लांब आहेत असं म्हणतात तेव्हा हे कायद्याचे हात गुन्हेगारांपर्यंत पोहोचतील अशी आशा करतांनाच लोकशाहीच्या पवित्र सभागृहात बहुरूपी आणि मांजर बोक्यांना आणि वाघांना एकूणच शीलवंत सदस्य सोडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या सर्वांना कायद्याचे भय वाटावे म्हणून कायद्याने आपले लांब हात पसरून आपली पकड घट्ट केली पाहिजे. आणि मतदार म्हणून येथील सजग नागरिकांनी भविष्यात अशा माणसांना या सभागृहात जाण्याची संधी नाकारली पाहिजे. एवढी माफक अपेक्षा करतानाच लोकशाहीच्या पवित्र सभागृहात यानंतर कोणत्याही मांजराचा म्याव म्याव आवाज येऊ नये ,त्यासाठी आता वाघ, मांजराच्या मागे पिंजरे लावलेच पाहिजेत . न्यायव्यवस्थेने मांजराच्या मागे पिंजरा लावून नांगी ठेचलीच पाहिजे. त्याचबरोबर सजग मतदारांनी अशा मांजरांना परत लोकशाहीच्या पवित्र सभागृहात पाठवू नये. यासाठी मताधिकाराच्या रूपाने अशा मांजराच्या मागे पिंजरा लावलाच पाहिजे . चला पुढील वेळी पिंजरा लावूयात....

––––––––––

राजू बोरकर
मु. पो. ता. लाखांदूर
जिल्हा :भंडारा
७५०७०२५४६७

# मां.खासदार वर्षाताई गायकवाड यांनी गावठाण हक्कांचा मुद्दा अखेर लोकेसभेत गाजविला. अभिनंदन वर्षाताई! तुमचे त्रिवार अभिनंदन.


आगरी कोळी भंडारी ईस्ट इंडियन आदिवासी हे मुंबईचे आद्य नागरिक आहेत. मुंबईच्या भूमिपुत्रांचा हा आवाज,आज दिल्लीत गरजला.काँग्रेसच्या महिला खासदार आदरणीय वर्षाताईंच्या बाणेदार वाणीतून.मुळात मुंबई ही महामाया एकवीरा मातृसत्ताक संस्कृतीची नगरी आहे.जिचा इतिहास २५०० वर्षांच्या तथागत गौतम,बुद्ध आणि सम्राट अशोक यांच्या विचारांचा आहे.लग्नात हुंडा न घेणे.अर्थ सत्ता,व्यापार हा महिलांच्या हाती देणारा मूळ मुंबईकर आहे.लग्न विधी विधवा महिला पुरोहित यांच्या कडून करून घेणारा,मनुस्मृती विरोधक,सर्वात जास्त सुसंस्कृत मानवी जीवन मूल्ये जगणारा असा हा ओबीसी समाज आहे.मुलींच्या जन्माचे स्वागत करणारा,रामायण, महाभारत यातील पुरुषसत्ताक संस्कृतीच्या विषमतेला पर्याय देणारी समतेची ही आगरी कोळी संस्कृती आहे. ठाणे,पालघर,मुंबई,रायगड या ऐतिहासिक अपरान्त प्रदेशाची खरी ओळख आपल्याला विदेशी इतिहासकार पेरीप्लस टॉलेमी यांच्या लिखित पुरातत्वीय संशोधन साधनात मिळते.

भारताचे उच्चवर्णीय इतिहासकार,लेखक,साहित्यिक,विचारवंत,राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी यांनी सागरपुत्र आगरी कोळी भंडारी आदिवासी ईस्ट इंडियन यांना कायम नाकारले.आज खऱ्या अर्थाने मातृसत्ताक मुंबईची लाडकी लेक सन्माननीय खासदार वर्षाताई गायकवाड,संविधानकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कसेल त्याची जमीन आणि राहील त्याचे घर या निसर्ग न्यायाने,कुळ कायद्याच्या तत्वावर,आमच्या पाठी उभी राहिली.त्याचा प्रचंड अभिमान इथल्या गावठाणाना कोळीवाड्याना आहे.महाराष्ट्राच्या विधान सभेने २०१६ / १७ मध्ये कोळीवाड्याना झोपडपट्ट्या म्हटले.गलिच्छ वस्त्या,ड्ठ– म्हटले.जुनी मनुनिर्मित शिवी आम्हास महाराष्ट्र सरकारने दिली.तत्कालीन सारे राजकीय पक्ष ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या उच्च जातीय जमीनदार, सरंजामी स्वभावाचे होते.या विरोधात आम्ही आगरी कोळी भंडारी लोक सरकारच्या अन्याय करणाऱ्या धोरणा विरोधात,घरे गावठाणे हक्कांचे आंदोलन सुरू केले.भाजपच्या आमदार ॲड.आशिष शेलार यांनी त्याची दखल घेतली.विधान सभेत कोळीवाडा गावठाणे यांच्या सीमांकनाचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी घेतला.मनुवादी चेहऱ्याचा भाजपा काही प्रमाणात बदलला.लोकसभेतल्या वर्षाताईंच्या वक्तव्याने राष्ट्रीय काँग्रेसही बदलतेय?. महाराष्ट्र मराठा काँग्रेस बदलेल काय? आगरी कोळी ओबीसींना गावठाण जमीन हक्क देईल काय?

मुंबईच्या आगरी कोळ्यांची जमीन पाच कोटी ते दहा कोटी गुठ्यांची आहे.या दरात भावात,एका गुंठ्यात,महाराष्ट्रात १००ते पन्नास एकर जमीन मिळते.म्हणूनच मौल्यवान मुंबईची लूट हेच सर्व पक्षीय राजकीय नेते आणि बिल्डर महायुतीचे शोषण आमच्या वाट्याला रोज येत आहे.सांताक्रूझ मुंबई येथील डेनिस डिसुझा यांच्या सरकारी सनद असलेल्या मालकी जागेत वारस नोंद न करता परप्रांतीय बिल्डर घुसले आहेत. हजारो कोटींची ही जमिनचोरी,पोलिस,मुंबई महानगर पालिकेच्या युतीतून सुरू आहे.खासदार वर्षाताईंचा हा मतदार संघ आहे.कुर्ला,मरोळ,अंधेरी येथील सर्व ईस्ट इंडियन वस्त्या अल्पंख्यक ख्रिश्चन यांना गावठाण जमिनीतून हद्दपार केले जात आहे.आम्ही आगरी कोळी भंडारी एकत्र येऊन लढत आहोत.भंडारी नेते मनोजभाई माशेलकर, मार्शल कोळी यांचा पुढाकार महत्वाचा ठरतोय.

मुंबईच्या भूमिपुत्रांच्या शेती,मासेमारी,बागायत,रेती,विटा,जलवाहतूक,सागरी व्यापार या व्यवसायांचे पुरावे महसूल दफ्तरी सापडतात.परंतु जिल्हाधिकारी भूमिअभिलेख कार्यालयातील घाटावरचे अधिकारी मुंबई महानगर पालिका प्रशासन,हे सारे दुर्लक्षित करतात.पैसा बोलता है?. याच तत्वाने आम्ही उच्चजातीय लोकांकडून आजही लुटले जात आहोत.आम्ही ओबीसी आमच्या गावठाण हक्कांबाबत जागे होणार कधी? जिवंत सातबारा ही चंद्रशेखर बावनकुळे या महाराष्ट्राच्या महसूल मंत्र्याची योजना मुंबई साठी नाही का?. डेनिस डिसुझा यांच्या परिवाराची वारस नोंद होईल का? की शर्मा कोठारी,लोढा,अदानी यांना मुंबई भाजपाने विकली आहे?

खासदार वर्षाताई यांनी मुंबईत १८९ गावठाणे तर ३६ कोळीवाडे आहेत.त्यातील फक्त ५२ गावठाणे आणि २२ कोळीवाडे मुंबई विकास आराखड्यात आहेत.असे म्हटले आहे. अर्थात गावठाण हा कायदा आहे.जो कोळीवाड्यानाही लागू होतो.तो भारतीय संविधानाच्या आर्टिकल ४० नुसार गावे,गावठाणे,ग्रामसभा संघटित करण्याचे दिशादर्शन करतो.स्वातंत्र्या नंतर आम्ही बकाल वाढणाऱ्या शहरांचे नियोजन करण्याचा प्रयत्न जरूर केला?. परंतु गावांचे नियोजन केले नाही.हे कटू सत्य स्वीकारावेच लागते.ग्राम पंचायतीला आजही नियोजन अधिकारी नाही.सरकारी नियोजन नसल्याने मुंबई ठाणे रायगड पालघर येथील आमची घरे,गावे अतिक्रमणे,अनधिकृत ठरवून ती एस आर ये,बिल्डर यांच्या घशात घालणारे नगर विकास खाते,ब्राह्मण मराठा वैश्य वृत्तीने आमच्या जमिनीचा बाजार मांडून बसले आहेत.त्यांचा जाहीर निषेध आम्ही केला पाहिजे.कोणत्या पक्षाकडे भारतीय राष्ट्रवाद आहे? जे ८५ टक्के स्त्रिया,ओबीसी,एससी, एसटी या भूमिहीन भारतीयांना जमीन मालकी द्यायला तयार आहेत?. इंग्रजांनी १९३०/३१ ला केलेला भारताचा जणगणना करून केलेला सर्व्हे नकाशा म्हणजे मूळ गावठाण हे आज एक एकराचे आहे.तर नैसर्गिक लोकसंख्या वाढीनुसार ते १००एकरापेक्षा अधिक वाढले आहे.जुन्या मूळ गावठाणा नंतर जिल्हाधिकारी,भूमी अभिलेख,यांनी विस्तारित गावठाण दर दहा वर्षांनी होणाऱ्या जनगणने नुसार वाढविले नाही.महसूल विभाग झोपा काढत आहे.याचा सर्वात अधिक त्रास आगरी कोळी भंडारी मुंबईकर लोकांना होतोय.



मुंबई वर सत्ता गाजविणाऱ्या शिवसेना भाजप या कडक हिंदुत्ववादी युतीने त्याच प्रमाणे सॉफ्ट हिंदुत्ववादी काँग्रेस राष्ट्रवादीने आगरी कोळी गावठाणे यांना झोपडपट्ट्या ड्ठ– समजून मोजली.हा अन्यायच आहे.ती आधुनिक मनुस्मृती आहे.मुंबईच्या गावठाण हक्कांची चळवळ ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर,आगरी नेते नारायण नागू पाटील,भंडारी नेते सी के बोले यांच्या प्रेरणेतून सुरू झाली. ती खोती,जमीनदारी नष्ट करणारी,संविधानिक समतेची चळवळ आहे.कोळीवाडे गावठाणे,अगदी आमच्या एससी एसटी भावांच्या झोपडपट्ट्यांचीही गुलामी संपून,त्यांना जमीन मालकी हक्क मिळून स्वयं विकास करता यावा हे या चळवळीचे ध्येय आहे.

अलीकडे मां मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वयं पुनर्विकास योजना मुंबई येथे राबविण्याच्या योजना जाहीर केल्या.त्या आगरी कोळी सागरपुत्र समाजासाठी नाहीत का?म्हणूनच आम्ही आमच्या जमीन हक्कांचा मूळ सातबारा शोधला पाहिजे. लोकवर्गणी काढून गावकमिटी केली पाहिजे.मूळ गावठाण विस्तारित गावठाण, वापरातील मोकळ्या जागा,घरे,रस्ते यांचा नकाशा बनवून तो महसूल विभागास सादर केला पाहिजे.चळवळ उभारून लोकप्रतिनिधी,प्रशासन,न्यायालये जागवली पाहिजेत. पत्रकार बांधव जागृत समाजसेवक यांना घेऊन रस्त्यावरची लढाई उभी केली पाहिजे.मी २०१९ साली लोकसभा निवडणूक वंचित बहुजन आघाडीतून याच गावठाण जमिनीसाठी लढलो. आदरणीय ॲड प्रकाशजी आंबेडकर,खासदार बॅरिस्टर असरुद्दीन ओवेसी यांची शिवाजी पार्क वर गावठाण हक्कासाठी झालेली ऐतिहासिक सभा माझ्या जीवनातला सर्वात मोठा सुवर्णक्षण होता.लोकसभेत खासदार वर्षाताई म्हणाल्या, आगरी कोळी भंडारी ईस्ट इंडियन आदिवासी यांच्या गावठाणांचे सीमांकन व्हावे. त्यांची विकास आराखड्यात नोंद व्हावी. लोकसभेतली ही मागणी देशातील गावे जी एकूण शहरांपेक्षा अधिक आहेत. त्या गावठाण विस्तार चळवळीस चालना देणारी मागणी आहे.मुंबई ठाणे,रायगड पालघर कोकण,महाराष्ट्र आणि भारतात ही जागृती यावी.अशी इच्छा ठेऊन मी २०२४ ची मावळ लोकसभा बहुजन समाज पार्टीतून लढलो.गावठाण हा प्रश्न जरी खेड्यांच्या नियोजनाचा असला तरी तो राष्ट्रीय प्रश्न आहे.७३ वी घटना दुरुस्ती करणारे,लोकशाहीत सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा ठराव मांडणारे, माजी पंतप्रधान राजीवजी गांधी, ग्राम पंचायतींना संसदे इतके अधिकार देतात.आज खासदार वर्षाताई यांनी पंचायत राज म्हणजे गावठाणाचा अधिकार लोकसभेत मांडून त्या दुरदर्शी नेतृत्वाला खरी आदरांजली वाहिली.

स्वार्थासाठी स्मार्ट सिटी,धारावी कोळीवाडा,सायन कोळीवाडा यांचा एस आर ए करणाऱ्या व्यापारी बिल्डर लॉबीला,सिडको,नैना यांना गावठाण हक्कही समजावेत. आम्ही शहरांचे शिल्पकार हे बिरूद मिरवणारी सिडको सारखी संस्था ओबीसींच्या गावांना उध्वस्त करतेय.मग गाव गावठाणे यांचे नियोजन करणारी एखादी संस्था शासन निर्माण करील का? शासनाला शहाणपण येईल,अशी आशा मी नम्रपणे व्यक्त करतो.आमच्या सर्व आमदार खासदार,नगरसेवक,ग्राम पंचायत सदस्य,यांना दिल्लीतल्या या वर्षाताईंनी मांडलेल्या,गावठाण हक्कांच्या वेदना कळाव्यात,हीच प्रामाणिक इच्छा आहे.या गावठाण हक्कास विरोध करणाऱ्या माझ्या मुंबई कर लाडक्या बहिणी आणि नवी मुंबईकर लाडके भाऊ यांनी आतातरी समजून घ्यावे.मुंबई पुणे,नाशिक,नागपूर यांसारखी,नवी मुंबई,नवी दिल्ली ही शहरे कितीही वाढली तरी त्यांना जन्म इथल्या खेड्यांनी दिलाय.ती जपली पाहिजेत.त्यांचा क्लस्टर एस आर ये.करणारे राजकारणी बिल्डर ही जमात आधुनिक देशी शोषक,लुटारू आहेत.त्यांना भूमिपुत्र आगरी कोळी भंडारी आदिवासी ईस्ट इंडियन यांनी संविधानिक विरोध करणे म्हणजे छत्रपती शिवराय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला रयतेचा, शूद्र अतिशूद्र स्त्रिया याच्या घरे जमिनी गावठाणे यांची मालकी देणारा मागास वर्गीय राष्ट्रवाद आहे.चला लढू या आपल्या हक्कांच्या घरे गावठाणे यांच्या जमिंन हक्कासाठी.

*********

मान.खासदार वर्षाताई आपले मनापासून आभार.
तुमचा छोटा भाऊ.
राजाराम पाटील ८२८६०३१४६३.उरण जिल्हा रायगड.

# उन्हाळ्यातील खाणे-पिणे; काय काळजी घ्याल?



औषधाविना उपचार भारतीय संस्कृतीत वर्षप्रतिपदेला खूप खूप मोठे महत्त्व आहे. नुकत्याच संपलेल्या फाल्गुन मासातील– शिशिर ऋतूतील हवीहवीशी वाटणारी थंडी केव्हाच संपलेली असते. बघता बघता वसंत ऋतूचा सर्वात सुखद काळ केव्हाच मागे पडलेला असतो आणि झपाट्याने तुमच्याआमच्या सर्वांच्याच दैनंदिन जीवनात उन्हाच्या वाढत्या काहिलीमुळे खूप प्रश्न उभे राहत असतात. एक काळ महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागांत जीवन खूपच साधेसुधे व तुलनेने कमीत कमी धावपळीचे होते. आत्ताच्या केवळ शहरी जीवनातच नव्हे, तर ग्रामीण भागातही प्रचंड फेरबदल, उलटापालट झालेली दिसते. 'वैशाख वणवा' म्हटले तर अत्यंत त्रासदायक, पण दुसरीकडे त्याला तारुण्याची उपमा प्राचीन व आधुनिक शारीर शास्त्रज्ञांनी दिलेली आहेच. मे महिन्याच्या धगधगत्या उष्ण किंवा दमट तसेच दोन्ही प्रकारच्या हवामानाला जो टिकेल 'तोच खरा पुरुष' अशी व्याख्या केली जाते.

भरपेट न्याहारी, पुरेसे जेवण

भारतीय विमानदलात मी सुमारे दीड तप नोकरी केली. देशात, विविध भागांत अठरा उन्हाळे अनुभवले. सर्वच एअर फोर्स युनिटमध्ये खास उन्हाळ्याकरिता पुढील प्रकारे सुखाच्या मूलमंत्राचे फलक लावलेले असतात. 'भरपेट न्याहारी आणि दुपारचे पुरेसे जेवण'. आत्ताच्या अति धावपळीच्या जगात काहींची दिवसाची सुरुवात भल्या पहाटे पाच–साडेपाचलाच होत असते. प्रत्येक कर्मचारी बाबू असो वा शारीरिक श्रमाची कामे करणारा कामगार असो, त्याला व्यवस्थित न्याहरी करायला 'वेळच– टाईम' नसतोच. तो कसाबसा कपभर चहा व त्याबरोबर पावाचा तुकडा किंवा दोन बिस्किटे खातो. अशा अत्यल्प सकाळच्या न्याहारीमुळे, आपण उन्हाळ्यात पुरेशी अन्नऊर्जा मिळवत नाही, हे त्याला कळत असते, पण वळतच नाही.

# सत्ताधारी भाजपा च्या उपनगराध्यक्षा वर अविश्वास ठराव दाखल.

अरविंद बिराजदार (उपनगराध्यक्ष न प चाकूर)
सामान्य कुटुंबातील राजकीय नेतृत्व नको आहे.मी सहजपणे कुधीही उपलब्ध होणारा उपनगध्यक्ष म्हणून लोकांच्या सेवेत आहे आणि कायम रहाणार.माझ्या विरूद्ध आकसापोटी,सुड भावनेने व राजकीय हेतू साध्य करण्यासाठी,हा अविश्वास प्रस्ताव दाखल केला असल्याचे उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांनी सांगितले.

अविश्वास ठरावाचे निवेदन प्राप्त झाले असून ते नगराध्यक्षाकडे पाठवले आहे. दहा दिवसात विशेष सभा बोलावून प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेद्वारे दोन तृतीयांश सदस्यांनी उपाध्यक्षांच्या विरोधात मतदान केले तर तो प्रस्ताव मंजूर केला जाईल.

चाकूर(प्रतिनिधी)चाकूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष यांच्यावर नगरपंचायतीच्या सदस्यांकडून बुधवारी अविश्वास प्रस्ताव मुख्याधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आला आहे. चाकूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांच्यावर बुधवारी दुपारी नगरपंचायतीच्या१५सदस्यांनी अविश्वासमुख्याधिकारी प्रतिक लंबे यांच्याकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला.यात उपनगराध्यक्ष हे आम्हाला विश्वासात न घेता व या पदासाठी वेळ देऊ शकत नसल्यामुळे आम्ही सदरील प्रस्ताव दाखल करत आहोत असे नमूद केले आहे. या प्रस्तावावर प्रामुख्याने अब्दुल करीम गुळवे,मिलींद महालिंगे,भागवत फुले,साईप्रसाद हिपाळे,मुजमिल सय्यद,शबाना सय्यद,ज्योती स्वामी,गंगुबाई गोलावार,गोदावरी पाटील,सुजाता रेड्डी,शुभांगी कसबे,वैशाली कांबळे,हिरकणा लाटे,सय्यद शाहीनबानो, अभिमन्यू धोंडगे यांच्या या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या आहेत. नगराध्यक्षांचा व उपनगरध्यक्षाचा कालावधी या टर्मपासून पाच वर्षाचा करण्यात आला आहे. प्रहार भाजप ची सत्ता नगरपंचातीवर आहे. राजकीय समीकरणे पाहता नगरपंचायतीत सर्वच नगरसेवक एकत्र राहून कामे करताना पहावयास मिळत आहे.उपनगराध्यक्षांच्या अविश्वास प्रस्तावावर भाजपा सह प्रहार काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या पंधरा नगरसेवकांच्या सह्यांचे निवेदन समाज मध्यवर्ती पाहून जनतेत मात्र वेगळीच वेगळीच खुशबूज चालू आहे.





# कोणत्या भाताबरोबर कोणती डाळ खावी? डाळ भात खाताना तुम्ही 'या' चुका करता का? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात

डाळ भात हा भारतीयांचा आवडता मेन्यू आहे. हे पदार्थ बनवायला सोपे व चवीला स्वादिष्ट आहेत, पण त्याबरोबरच ते संतुलित आहारासाठी महत्त्वाचा घटक मानले जातात. यामध्ये प्रोटिन आणि कार्बोहायड्रेट्स भरपूर प्रमाणात असतात.

खरं तर तांदूळ आणि डाळीचे सर्व प्रकार समान पौष्टिक फायदे देत नाही. जेव्हा आपण योग्य डाळ भात एकत्र खातो तेव्हा त्याचे पौष्टिक मूल्य वाढते, जे आपल्याला आवश्यक पोषक तत्वे व ऊर्जासुद्धा पुरवतात.

हंग्री कोआला येथील वरिष्ठ न्युट्रिशनिस्ट इप्सिता चक्रवर्ती यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, डाळ आणि तांदळाच्या योग्य प्रकाराचे एकत्र सेवन केल्याने आपल्याला जास्तीत जास्त पौष्टिक फायदा मिळू शकतो.

न्युट्रिशनिस्ट इप्सिता चक्रवर्ती सांगतात, डाळ भात भारतीय घरांमध्ये प्रामुख्याने बनवला जातो. यामध्ये कार्बोहायड्रेट्स, प्रोटिन्स आणि आवश्यक पोषक घटक असतात. वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी आणि भाताच्या मिश्रणाचे एकत्र सेवन केल्याने शरीराला पौष्टिक घटक मिळू शकतात.

आज आपण न्युट्रिशनिस्ट इप्सिता चक्रवर्ती यांनी सांगितलेले शरीराला पौष्टिक घटक पुरविणारे डाळ आणि तांदळाचे सहा प्रकारचे मिश्रण (संयोजन) जाणून घेणार आहोत.

मसूर भाताबरोबर तूर डाळ तूर डाळ : यामध्ये प्रोटिन्स, फायबर आणि फोलेटचे प्रमाण जास्त असते, जे अधिक ऊर्जा पुरवतात आणि पेशींच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.

मसूर भात : योग्य प्रमाणात ग्लायसेमिक इंडेक्स असलेला हा भात दीर्घकाळ ऊर्जा पुरवतो.

याचे एकत्र सेवन केल्याने शरीराला भरपूर प्रोटिन्स आणि भातातून मेथिओनाइन (शींहळेपळपश) प्रदान करते, जे डाळीमध्ये नसते. मेथिओनाइन हे एक आवश्यक अमिनो ॲसिड आहे, जे प्रोटिन तयार करण्यासाठी गरजेचे असते.

मसूर डाळ आणि ब्राऊन तांदूळ

मसूर डाळ (लाल मसूर) : लाल मसूरमध्ये लोह आणि फॉलिक ॲसिड भरपूर प्रमाणात असते, जे लाल रक्तपेशी तयार करण्यास प्रोत्साहन देतात आणि अशक्तपणा दूर करतात.

ब्राऊन तांदूळ : फायबर आणि मॅग्नेशियमयुक्त ब्राऊन तांदूळ हृदयाच्या आरोग्यास फायदेशीर असतो आणि पचनास मदत करतो. आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यासाठी हे मिश्रण फायदेशीर आहे.



मूग डाळ (हिरवे मूग) आणि बासमती तांदूळ :

हिरवे मूग : हिरवे मूग पचायला हलके असतात. यामध्ये व्हिटॅमिन्स ए, बी आणि के भरपूर प्रमाणात असतात. यात रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे अँटिऑक्सिडंट्स असतात.

बासमती तांदूळ : पांढऱ्या तांदळापेक्षा या तांदळामध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स असतो, जो सतत ऊर्जा प्रदान करतो.

हे मिश्रण पचनाची समस्या असलेल्या किंवा कमी फॅटयुक्त आहार घेणाऱ्या लोकांसाठी खूप फायदेशीर आहे.

उकडा तांदूळ आणि चणा डाळ

चणा डाळ (चणा डाळ) : या डाळीमध्ये झिंक आणि पोटॅशियमचे प्रमाण अधिक असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन देते.

उकडा तांदूळ : या तांदळामध्ये जास्त व्हिटॅमिन्स, विशेषतः बी–कॉम्प्लेक्स (बी१, बी२, बी३, बी५, बी६, बी७, बी९ आणि बी१२) जास्त प्रमाणात असते. काळ्या तांदळाबरोबर उडीद डाळ

उडीद डाळ : या डाळीमध्ये प्रोटिन्स, लोह आणि मॅग्नेशियमचे प्रमाण अधिक असते, जे हाडांच्या आरोग्यासाठी आणि स्टॅमिना वाढवण्यासाठी फायदेशीर असते. काळा तांदूळ : या तांदळामध्ये अँथोसायनिन्ससारखे अँटीऑक्सिडंट्स असतात, जे छातीतील जळजळ कमी करतात आणि मेंदूचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात. ज्या लोकांना शरीरात लोहाची कमतरता असेल, त्यांच्यासाठी हे मिश्रण उत्तम आहे. लाल तांदळाबरोबर तूर डाळ

तूर डाळ : या डाळीमध्ये प्रोटिन्स, कार्बोहायड्रेट्स आणि पोटॅशियम तसेच मॅग्नेशियमचे चांगले प्रमाण अधिक असते. लाल तांदूळ : यामध्ये अँथोसायनिन अँटिऑक्सिडंट्स आणि फायबरचे प्रमाण जास्त असल्याने मधुमेह आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

हे मिश्रण ऊर्जेचा एक पॉवरहाऊस आहे, जो हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतो. वरण भात बनवण्याची पद्धत महत्त्वाची चक्रवर्ती सांगतात, डाळ भातातील पौष्टिकता टिकवून ठेवण्यासाठी स्वयंपाक करण्याची पद्धत खूप महत्त्वाची भूमिका बजावते. डाळ आणि तांदूळ जास्त शिजवल्याने बी–कॉम्प्लेक्स आणि व्हिटॅमिन सीसारख्या पाण्यात विरघळणाऱ्या पौष्टिक घटकांचे नुकसान होऊ शकते. तसेच तांदूळ उकळल्यानंतर त्यातील पाणी काढून टाकल्याने पोषक घटक नष्ट होतात. त्यासाठीप्रेशर कुकर हा एक चांगला पर्याय आहे. प्रेशर कुकरमध्ये कमी वेळात आणि कमीत कमी पाण्याचा वापर करून अधिक पोषक तत्त्वे टिकवून ठेवता येतात. चक्रवर्ती पुढे सांगतात की, तांदूळ किंवा डाळ जास्त प्रमाणात धुतल्याने आवश्यक व्हिटॅमिन बी नष्ट होऊ शकतात, म्हणून एक दोन वेळा डाळ तांदूळ धुणे पुरेसे आहे.

डाळी आणि पॉलिश न केलेले तांदूळ निवडल्याने फायबर आणि पोषक तत्त्वांचे प्रमाण जास्त राहते. इडली किंवा डोसासारख्या आंबवलेल्या पदार्थांमध्ये डाळी पोषक तत्त्वे टिकवून ठेवतात आणि पचनक्षमता वाढवतात. डाळ भात बनवताना त्यात थोड्या प्रमाणात तूप किंवा तेल घातल्याने आरोग्याला धोका निर्माण होत नाही, उलट व्हिटॅमिन ए आणि डीसारखे फॅट सोल्युबल व्हिटॅमिन्स शोषून घेण्यास मदत होते. डाळ भात बनवताना या चुका करू नका डाळ भात हा जेवणातील महत्त्वाचा पदार्थ आहे. हे चुकीच्या पद्धतीने बनवल्याने किंवा एकत्र सेवन केल्याने त्याचे पौष्टिक मूल्य कमी होऊ शकते. चक्रवर्ती सांगतात, फक्त पॉलिश केलेल्या पांढऱ्या तांदळावर अवलंबून न राहता फायबर आणि अँटिऑक्सिडंट्ससाठी ब्राउन, लाल किंवा काळ्या तांदळाचा आहारात समावेश करा. डाळीचे पौष्टिक प्रमाण वाढवण्यासाठी भाज्या, मसाले आणि औषधी वनस्पतींचा समावेश करा. प्रोबायोटिक्ससाठी दही किंवा सॅलेडचे त्याबरोबर सेवन करा.

मीठ आणि तुपाचे मर्यादित सेवन करा, चवीसाठी हळद किंवा जिरेसारखे मसाले वापरा. वरण भातातील पोषक तत्त्वे टिकवून ठेवण्यासाठी पाणी काढू नका आणि प्रोटिन्स आणि कार्बोहायड्रेट्सचे नीट संतुलन राखण्यासाठी डाळ आणि तांदळाचे संतुलित प्रमाण २:१ ठेवा. चक्रवर्ती सांगतात, विविध पोषक घटकांचे सेवन करण्यासाठी डाळ आणि तांदळाचे प्रकार बदलत राहा.

# कळंब अंबाजोगाई रोडवर दोन तास रास्ता रोको.

## शासनाने अनु-जाती आश्रम शाळांना शंभर टक्के वेतन शंभर टक्के अनुदान द्यावे - लव्हू बनसोडे.

केज/प्रतिनिधी राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर अनु. जातीच्या आश्रम शाळांना विशेष बाब म्हणून अधिवेशनात शंभर टक्के अनुदान, शंभर टक्के वेतन श्रेणी शासनाने तात्काळ द्यावी या मागणी साठी अंबाजोगाई कळंब रोड, धनेगाव फाटा, पाथरा येथे दोन तास रास्ता रोको करण्यात आला. शासनाने राज्यातील २००२ मध्ये वर्तमान पत्राद्वारे अनु. जाती निवासी आश्रम प्रस्ताव मागवून शाळा चालू करण्यास सांगीतले तेव्हा पासून शाळा व कर्मचाऱ्यांना एकही रुपया दिलेला नाही त्यामुळे पुढील मागण्या साठी आज दोन तास रास्ता रोको करण्यात आला. मा. न्यायालय खंडपीठ नागपूर यांचा निर्णय दि,२८ ' २ / २००३,रि. पी. क्र.९५६ / २००३ मध्ये मा. उच्च न्यायालय यांनी दिलेला २८८आश्रम शाळांना तपासणीस आधीन राहून १६५



आश्रम शाळांना तात्काळ १०० टक्के अनुदान द्यावे. २ )राज्यातील १६५ आश्रम शाळेतील कर्मचार्यांना मान्यता मिळाल्यापासून, तपासणीस अनुदाना स पात्र ठरलेल्या १६ ५ शाळेतील कर्मचार्यां ना विशेष बाब म्हणून अधिवेशनात १०० टक्के वेतनश्रेणी द्यावी. तसेच आज पर्यंत संस्था चालक, कर्मचारी यांनी कसलाच एक रुपयाही पगार किंवा अनुदान न दिल्याने आत्महत्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे शासनाने आजपर्यंत फक्त तपासण्याच केल्या आहेत तरी आतातरी एक रुपयाही अनुदान व वेतन न दिल्याने सर्वस्वी जबाबदारी स्विकारून तात्काळ १६५ आश्रम शाळांना १०० टक्के अनुदान व १०० टक्के वेतन श्रेणी द्यावी या व इतर मागण्या साठी आज अंबाजोगाई कळंब रोड धनेगाव फाटा, पाथरा येथे दोन तास रास्ता रोको आंदोलन केले या वेळी सर्व कर्मचारी तसेच संस्था चालक उपस्थित होते या मागण्याचे निवेदन मा. राष्ट्रपती साहेब, मा. प्रधान मंत्री कार्यालय, मा. राज्यपाल साहेब, मा. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र, मुंबई, सामाजिक न्याय मंत्री साहेब, अनु.जाती आयोग मुंबई सह अनेक ठिकाणी दिले असून यावेळी युसुफ वडगाव पोलिस स्टेशन चे बसवेश्वर चनशेट्टी यांनी निवेदन स्विकारले तसेच यावेळी युसुफ वडगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी जी एम राऊत, योगेश समुद्रे, सय्यद अमजद, केदार, थोरात, आदि उपस्थित होते तसे अनु. जाती आश्रम शाळा संघर्ष समितीचे अध्यक्ष लव्हू बनसोडे, सागर बनसोडे, धनंजय बनसोडे, आशा राऊत, अनिता बनसोडे, पौळ व इतर कर्मचारी, उपस्थित होते.

## केज तालुक्यातील ११४ ग्राम पंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर.




केज/प्रतिनिधी आगामी पाच वर्षात तालुक्यात होणाऱ्या ११४ ग्राम पंचायतीच्या निवडणुकीतील सरपंच पदाचे आरक्षण, मंगळवारी सकाळी ११-०० वाजता तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अध्यक्षतेखाली केज तहसील कार्यालयाच्या सभागृहात धोत्रा येथील ४ वर्षाचे बालक देवेश विनोद मजमुले याच्या हस्ते चिठ्या काढून जाहीर करण्यात आले. तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अध्यक्षते खाली मंगळवारी सकाळी ११-०० वाजता सुरु झालेली आरक्षण सोडतीची प्रक्रिया दुपारी १-०० वाजे पर्यंत चालली. यात सर्वसाधारण महिलांसाठी ३२, नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी १६,अनुसूचित जातीच्या महिलांसाठी ९ तर अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी ढाकेफळ ही एकमेव ग्रामपंचायत आरक्षित राहिली आहे. सर्वसाधारण पुरुषांसाठी ३१,नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी १५,अनुसूचित जाती साठी ९,तर अनुसूचित जमातीसाठी एकमेव सोनी जवळा आरक्षित राहिले आहे. यावेळी तहसीलदार राकेश गिड्डे, नायब तहसीलदार आशा वाघ (गायकवाड), अशोक भंडारे, श्रीमती सुजाता रामटेके, पेशकार वैशाली भिसे, गोकुळ नन्नवरे, जब्बार पठाण यांचेसह तालुक्यातील प्रमुख राजकीय पक्षाचे नेते, मंडळ अधिकारी, तलाठी, कार्यकर्ते, सरपंच, व नागरिक मोठया संख्येने हजर होते.

## पुणे जिल्ह्यात एकावर प्राणघातक हल्ला करुन पळून आलेले सात जण केज पोलिसांच्या जाळ्यात

केज/प्रतिनिधी पुणे जिल्ह्यातील कारेगाव (ता. शिरूर घोडनादी) येथील एका तरुणांवर धारदार कोयत्याने प्राणघातक हल्ला करून तीन दुचाकीवरून पळून आलेल्या सात संशयित आरोपीना मस्साजोग शिवारातील एका पेट्रोल पंपाजवळ ताब्यात घेतले. याबाबतची माहिती की, रांजणगाव पोलिसांनी वायरलेस वरून केज पोलिसांना दिली होती. त्यावरून पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मस्सा जोग शिवारात केज पोलिसांनी सापळा लावून सात जणांना जेरबंद केले आहे. शिवाजी नगर,गंगाखेड (जि. परभणी) येथील सौरभ श्रीराम राठोड (वय १७ वर्षे) हा युवक पुणे जिल्ह्यातील कारेगाव ( ता. शिरूर घोडनदी ) परिसरात शिक्षणासाठी वास्तव्यास आहे. २३ मार्च रोजी रात्री ९-०० वा. सुमारास सौरभ राठोड यास तु ओंकार देशमुख यास खुन्नस देवुन का बघितलेस, ओंकार देशमुख कोण आहे? तुला माहित आहे कां? थांब तुला जिवंतच सोडीत नाहीत आसे म्हणत गिरीश कराळे, रोहन बोटे, शंकर करंजकर, ओंकार देशमुख, ओम चव्हाण, रोहन गाडे (सर्व रा. कारेगाव ता. शिरूर घोडनदी) व



दोन अनोळखी मित्रांनी कोयत्याने पोटात व पाठीवर वार करीत त्याच्या डोक्यात दगडाने मारून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सोडविण्यासाठी गेलेल्या यश राजू धनवटे यास हाताने व लाथाबुक्यांनी मारून दमदाटी केली. सौरभ राठोड याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू असून यश धनवटे याच्या फिर्यादीवरून वरील सात जणांसह इतर अनोळखी दोघां विरुद्ध रांजणगाव एम आय डी सी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे हे तपास करीत होते.या प्रकरणातील सातही आरोपी हे दुचाकीवरून बीड जिल्ह्यातील केज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मस्साजोग शिवारात पळून गेल्याचे लोकेशन पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांना मिळाले. हीं माहिती त्यांनी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांना भ्रमनध्वनी वरून दिली. पाटील यांनी तात्काळ पोलीस उप निरीक्षक उमेश निकम, फौजदार मांजरगे, जमादार उमेश आघाव, बाळासाहेब अहंकारे यांचे पथक या परिसरात रवाना केले. या पथकाने सोमवारी सायंकाळी ७-०० वाजण्याच्या दरम्यान या गुन्ह्यातील सात संशयित आरोपीना मस्साजोग शिवारातील एका पेट्रोल पंपाच्या परिसरातून जेरबंद केले असून सातही आरोपीना रांजणगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी दिली.

## ३१ मार्च पर्यंत पात्र लाभार्थ्यांनी तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी ई-केवायसी न करणाऱ्या लाभार्थ्यांचा धान्यांचा लाभ होणार बंद-श्रीम.सुजाता रामटेके

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांनी ३१ मार्च २०२५ पर्यंत तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी अन्यथा ई-केवायसी न करणाऱ्या लाभार्थ्यांचा धान्यांचा लाभ बंद होणार आहे अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे केज तहसीलच्या पुरवठा विभागाच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीम.सुजाता रामटेके यांनी दिली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, शासनाच्या निर्देशा नुसार केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विभागाच्या वतीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभधारकांना ई-केवायसी करण्यासाठी कॅम्प आयोजित केले होते.ई-केवायसी कॅम्प मध्ये अनेक लाभार्थ्यांनी केवायसी करून घेतली आहे या कॅम्पला लाभधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील शिधापत्रिकाधारकांना शासकीय अनुदानित धान्याचा लाभ सुरू ठेवण्यासाठी कुटुंबातील रेशन कार्ड मध्ये नोंदणी केलेल्या सर्व सदस्यांची ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. ज्या सदस्यांची ई-केवायसी दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी पर्यंत मुदतीत पूर्ण होणार नाही, आशा सदस्यांचा अन्नधान्याचा लाभ बंद होणार आहे. तरी शासन निर्देशानुसार सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या गावातील रास्त भाव दुकानदाराशी तात्काळ संपर्क करून रास्तभाव दुकानात समक्ष उपस्थित राहून ई-पॉस मशीनवर बायोमेट्रिक थंम देऊन ई-केवायसी करून घ्यावी किंवा शासनाने उपलब्ध करून दिलेल्या मेरा-केवायसीप द्वारे स्वतःच्या मोबाईल




वरून दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत आपली ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. ई-केवायसी पूर्ण न केल्यास अन्नधान्याचा लाभ बंद करण्याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त झाले आहेत. जर ई-केवायसी न केल्यास अन्नधान्याचा लाभ बंद झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची असेल याची नोंद घेण्यात यावी असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. लाभार्थ्यांनी ई-केवायसी करण्यासाठी स्वस्त धान्य दुकानात जाता वेळी सोबत कुटुंबातील सर्व सदस्यांचे मूळ आधार कार्ड झेरॉक्स प्रति व रेशन कार्ड घेऊन जाणे बंधनकारक आहे. तरी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी तात्काळ आपल्या गावातील स्वस्त धान्य दुकानात जाऊन ई-केवायसी करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या आदेशावरून पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुजाता रामटेके यांनी केले आहे.

## ज्ञानाने परिपूर्ण असणारी माणसे स्वाभिमानी असतात- प्राचार्य डॉ. हरिदास फेरे

मुरुड/ महेंद्र आल्टे : ज्ञान हे जगात सर्वश्रेष्ठ व मौल्यवान आहे म्हणून विद्यार्थ्यांना सतत ज्ञानाची भूक असली पाहिजे. हे ज्ञान शिक्षणाने मिळते. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षणाने माणसे मोठी बनतात व माणसाने पाहिलेली स्वप्नेही पूर्ण होतात. तसेच ज्ञानाने परिपूर्ण असणारी माणसे स्वाभिमानी असतात. असे उद्गार प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांनी काढले.

मुरुड येथील संभाजी महाविद्यालयालयात बी.ए. व बी. एस्सी. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यासाठी घेण्यात आलेल्या निरोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम हे होते. विचारमंचावर प्रा. डॉ. गोरे बी. एम. यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या घराला लावलेल्या मोठ्या कुलूपामुळे आपल्या घराचे रक्षण होत नाही तर आपल्या घराभोवती असणाऱ्या शेजाऱ्यामुळे आपल्या घराचे रक्षण होते. म्हणून तुम्ही ज्या समाजात, ज्या गावात व ज्या शेजाऱ्या पाजाऱ्या जवळ राहता त्यांच्याबद्दल सामाजिक जाणीव ठेवून आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे अशी सामाजिक भावना व सामाजिक ईमानदारी असणारी माणसेच इतिहास निर्माण करतात.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनीही विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्याच्या शुभेच्छा देऊन बहुमोल मार्गदर्शन केले.

यावेळी कु. काळे प्रतिक्षा व कु. जोशी अक्षता या विद्यार्थिनीनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्नेहा गायकवाड तर उपस्थितांचे आभार कु. गुंड श्रद्धा यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जाधव बी.एम. , प्रा. दिक्षीत ए.व्ही. , प्रा. धाबेकर आर. आर . , प्रा . वारे डी. वाय. , प्रा. सहलुगडे ए. आर. , प्रा. सवासे के. जे. , प्रा. पिंजारी ए. आय. व प्रा. मगर आर. एस. यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रा.सौ. कदम एम. एस. , प्रा. मधुकर क्षीरसागर , प्रा. डॉ. चावरे एम. व्ही. , प्रा. पैठणकर एन. एल. , प्रा. दळवे आर.जी. , प्रा. सूर्यवंशी ए. व्ही. , विद्यार्थी संसदेचा सचिव हिंगे संदेश व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय संविधान राष्ट्रीय चारित्र्य निर्माणाचे प्रभावी माध्यम डॉ. श्रीराम भालेराव


लातूर :- भारतीय संविधान हे राष्ट्राचे चारित्र्य निर्माणाचे प्रभावी माध्यम असून संविधानाच्या मजबूत पायावर भारताची लोकशाही टिकून आहे असे प्रतिपादन डॉ. श्रीराम भालेराव यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिरातील बौद्धिक सत्रात ते बोलत होते. यावेळी विचारपीठावर अध्यक्षस्थानी डॉ. मनोहर चपळे हे होते तर विचारमंचावर प्रा. किसनाथ कुडके आणि माजी मुख्याध्यापक बाबुराव सावंत यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. भालेराव म्हणाले की, भारतीय राज्यघटनेने दिलेले मूलभूत अधिकार निर्भीड व स्वाभिमानाचे जगणे भारतीय नागरिकांना प्रदान करते. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या मूल्यांचा उद्घोष करणारी आहे. भारतीय संविधान भारतीय नागरिकांच्या जीवनाचा आधार आहे. भारत हा लोकशाही व्यवस्था राबवणारा जगातील सर्वात



मोठा देश आहे, त्यामुळे संविधानाचा संविधानाचा सन्मान सर्वांनी करावा असेही ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. मनोहर चपळे म्हणाले की, भारतीयांनी संविधानिक अधिकाराबरोबरच कर्तव्याची जाणीव ठेवून भविष्याची वाटचाल करायला हवी. संविधानिक मूल्ये प्रत्यक्ष व्यवहारात येण्याची नितांत गरज असल्याचेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. किसनाथ कुडके यांनी केले. सूत्रसंचालन ऋतुजा भिसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिवाली मुकडे यांनी मानले. या कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविका आणि हॅपी व्हिलेज येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## लातूर व्यापारी धर्मशाळा करणार २५ मोफत तिरळेपणा, मोतीबिंदू आणि डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी मिरागी नेत्रालयाला आर्थिक सहकार्य नँबचे अध्यक्ष डॉ. विजय राठी

लातूर :- लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा मिरागि नेत्रालयाला २५ तिरळेपणा, मोतीबिंदू व डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहकार्य करणार असल्याची माहिती नँब, लातूरचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी दिली आहे. लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा सामाजिक बांधिलकी म्हणून काही कार्यक्षेत्रातील सेवाभावी संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याच्या भावनेतून नँब संचलित मिरागी नेत्रालयासाठी आर्थिक सहकार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. मिरागी नेत्रालय ही संस्था डोळ्यांच्या सर्व उपचारासाठी अविरत सेवा करीत आहे. अनेक मोफत शिबिर व शस्त्रक्रिया मिरागीने केल्या आहेत. खासकरून मुलांचे तिरळेपणाचे ऑपरेशन, मोतीबिंदू व अनेक डोळ्याच्या शस्त्रक्रिया एक तर मोफत किंवा अतिशय अल्प दरात केल्या जातात. या सर्वांची दखल घेऊन लातूर व्यापारी धर्मशाळा ह्या संस्थेने संस्थेस २५ ऑपरेशन करण्यासाठी आर्थिक



सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. याचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो व दारिद्र्यरेषेखालील सर्टिफिकेट असणे गरजेचे आहे. ही योजना फक्त ऑपरेशनसाठी असेल. बाकी खर्च पेशंटला करावा लागेल. या योजनेसाठी ०१ एप्रिल २०२५ पासून नोंदणी करून तपासून घ्यावे. मीरागी नेत्रालय हे गीतांजली मार्केट, लातूर येथे आहे. तपासणीसाठी वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ०६ वाजेपर्यंत आहे. सर्व पेशंटनी सर्व कागदपत्रे सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. या सहकार्यासाठी अरविंद सोनवणे, लक्ष्मीरमण लाहोटी, रमेश राठी, दिनेश इनानी, हेमंत बोरा, ललित शहा, रमेश बियाणी आणि ईश्वरप्रसाद डागा आदींचे मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे त्याबद्दल नँबचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE